सयाजी ज्ञानमाला : ९

# महाराजा सयाजीराव 'शिवसृष्टी' चे निर्माते

सागर मोहिते



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

सयाजी ज्ञानमाला : १

# महाराजा सयाजीराव ‘शिवसृष्टी’चे निर्माते

सागर मोहिते

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
'शिवसृष्टी'चे निर्माते
इतिहास
सागर मोहिते
●
प्रकाशन क्रमांक - २१
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४
●

सयाजी ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सागर दगडू मोहिते
तुकाबाई गल्ली, मोहरे
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
पिन कोड : ४१६११४
९९६०३६४०५८
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
1018507877(1) - 30-09-2019**

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**सयाजी ज्ञान माला**
**ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# 'शिवसृष्टी'चे निर्माते

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होत असताना संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नायक शिवाजी महाराज होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील सुराज्य साकारण्याचा संकल्प महाराष्ट्राने सोडला होता. परंतु १७ व्या शतकातील शिवाजी महाराजांचे सुराज्य २० व्या शतकात साकारण्याचे प्रारूप मात्र १९ व्या शतकात सयाजीरावांनी बडोद्यात तयार केले होते. त्यामुळे हे सुराज्य सयाजीरावांमार्फत यशवंतरावांकडे आले होते. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाणांनी १९ नोव्हेंबर १९६० रोजी घेतलेला पहिला निर्णय म्हणजे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना होय.

अशा प्रकारचे मंडळ स्थापन करणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य होते. या मंडळाची ध्येय आणि उद्दिष्टेये हे थेटपणे सयाजीराव महाराजांनी या क्षेत्रात केलेल्या कामाचे अनुकरण होते. या निर्णयाबरोबरच महाराष्ट्रात सुरू झालेले अनेक उपक्रम

हे बडोद्याशी नाते सांगतात हा योगायोग नव्हता. तर सयाजीरावांचे केलेले ते डोळस आणि बौद्धिक अनुकरण होते. याचा एक ठोस पुरावा म्हणजे १९६२ साली यशवंतराव चव्हाणांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे समग्र साहित्य प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला होता. याला कारण होते पुढच्याच वर्षी म्हणजे १९६३ ला सयाजीरावांची जन्मशताब्दी होती. परंतु दरम्यान १९६२ चे भारत-चीन युद्ध सुरू झाल्याने यशवंतराव संरक्षण मंत्री म्हणून केंद्रात गेले. त्यामुळे हे काम मागे पडले. परंतु या निमित्ताने 'शिवाजी महाराज-सयाजीराव-यशवंतराव' हा अनुबंध मात्र अधोरेखित झाला.

पुण्यातील १२ मावळांत लहानपण गेलेल्या शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वसमावेशकता ही लहानपणी विविध जातींच्या सवंगड्यांबरोबर निर्माण झालेल्या नात्याचा परिपाक होता. तर सयाजीरावांचे बालपण कवळाण्यासारख्या खेड्यात सामान्य आणि सर्व जातीतील बालमित्रांमध्ये गेल्याने त्यांच्या सर्वसमावेशकतेचे मूळ येथे आढळते. पुढे आयुष्यभर जगप्रवासातून कमावलेली तुलनात्मक दृष्टी, धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचा तुलनात्मक व्यासंग याच्या जोरावर या सर्वसमावेशकतेचा परमोच्च विकास सयाजीरावांनी साधला.

मावळ्यांच्या साथीने आयुष्यभराच्या संघर्षातून उभा केलेल्या स्वराज्याला शिवाजी महाराज खाजगी मालमत्ता न समजता नेहमी 'रयतेचे राज्य' असे संबोधत. शिवाजी 'महाराजांमधील'

उपभोगशून्य ‘ऋषीत्वाचा’हा आविष्कार होता. सयाजीरावांनी आपल्या खाजगी खर्चाची तपासणी सरकारी अधिकाऱ्याच्या अखत्यारित आणून शिवाजी महाराजांचा ‘वारसा’ पुढे चालवला. विशेष बाब म्हणजे १९३६ मध्ये राज्यकारभाराच्या हीरकमहोत्सवीप्रसंगी सयाजीरावांनी अस्पृश्योद्धाराच्या कामासाठी खाजगी फंडातून १ कोटी रु.ची तरतूद करत उपभोगशून्य राजाचे मूर्तिमंत उदाहरण भारतासमोर ठेवले.

## शेतकऱ्यांचे कल्याण

शेतकऱ्यांची स्थिती सुधारून त्यांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी शिवाजी महाराजांनी सातत्याने प्रयत्न केले.मोहिमेवरील आपल्या सुभेदारांना लिहिलेल्या पत्रात शिवाजी महाराजांनी रयतेवर कोणतीही जबरदस्ती न करता बाजारभावाप्रमाणे फौजेस लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्याची ताकीद दिली होती. फौजेने मार्गक्रमण करताना शेतकऱ्यांच्या पिकांची नासधूस न करण्याची सूचना आपल्या सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना केली. दुष्काळाच्या महाभीषण संकटात शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील शेतकऱ्यांना सारामाफी दिली. तसेच नव्याने लागवडीखाली आलेल्या जमिनींवरील शेतसारा वसुलीमध्ये सूट दिली.शेतकऱ्यांच्या अडचणींच्या काळात शिवाजी महाराजांनी केलेली मदत उभा महाराष्ट्र जाणतो.

सयाजीरावांनी बडोद्यातील दुष्काळाच्या आपत्तीप्रसंगी ४ डिसेंबर १८९९ ते मार्च १९०० या चार महिन्यांच्या काळात २१,१७३चौ.कि.मी.आकाराच्या आणि चार प्रांतांत विभागलेल्या आपल्या संस्थानाचा दुष्काळ पाहणी दौरा केला. या दौऱ्यात सयाजीरावांनी महसुली अधिकाऱ्यांना खेडी पिंजून काढून निराधारांना मदत करण्याचे आदेश दिले. शेतसारा वसुलीसाठी कोणत्याही कठोर उपाययोजना करण्यास सयाजीरावांनी आपल्या अधिकाऱ्यांना मनाई केली. शेतसारा भरण्यास असमर्थ असणाऱ्या व्यक्तींना शक्यतो वर कोणत्याही प्रकारची सक्ती करू नये असा धोरणात्मक निर्णय घेतला. दुष्काळी मदत कार्यात मदत करणारे कामगार आणि महाराजांच्या दौऱ्यादरम्यान त्यांना भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याचा हुकूम सयाजीरावांनी आपल्या मंत्र्यांना दिला. शिवरायांची परंपरा उन्नत, उत्क्रांत आणि परिपूर्ण करून 'सुराज्य'कसे निर्माण होते याची साक्ष सयाजीरावांनी दुष्काळादरम्यान केलेल्या उपाययोजनांवरून पटते.

मध्ययुगीन भारतातील राज्यकर्त्यांनी शेतसारा वसुलीचे अधिकार आपल्या राज्यातील वतनदारांना दिले होते. हे वतनदार जनतेची मनमानी पद्धतीने लूट करत. शिवाजी महाराजांनी सारावसुलीच्या या पद्धतीत बदल करत धारा पद्धती स्वीकारली. निजामशाहीचा सेनापती मलिक अंबरने ही पद्धत विकसित केली होती. या पद्धतीत सरकार आणि शेतकऱ्यांमधील मध्यस्थ

व्यक्तीनाहीसा करून दोघांमध्ये थेट करार करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वतनदारांकडून होणाऱ्या लुटीला आळा बसला.

सयाजीरावांनी राज्याधिकार प्राप्तीनंतर बडोद्यातील सारावसुलीच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणले. संस्थानातील जमिनीचा सर्व्हे करून प्रतवारीनुसार शेतकऱ्यांकडून सारावसुलीस प्रारंभ करण्यात आला. देवस्थान आणि धार्मिक संस्थांना बडोदा सरकारच्या वतीने मोफत देण्यात आलेल्या जमिनींना बारखळी जमीन म्हणून ओळखले जाई. या जमिनींचे सर्व्हेक्षण करून त्या जमिनींवर सारा आकारण्यास सुरुवात करत सयाजीरावांनी शिवाजी महाराजांच्या जमीन महसूल धोरणाचा विकास केला.

याचबरोबर सयाजीरावांनी बडोदा संस्थानात शेतीच्या विकासासाठी अनेकविध प्रयत्न केले. कृषी उत्पादन वाढीसाठी शेतीला वेळेवर पाणीपुरवठा करणे गरजेचे असते. शेतीची ही गरज ओळखून सयाजीरावांनी शेतीस वेळेत व अखंड पाणीपुरवठा व्हावा यासाठी १९२९ मध्ये सहकारी पॉवर पंप संस्थांची स्थापना केली. या पॉवर पंप संस्थांनी सभासदांबरोबरच इतर खेडूतांना शेतीसाठी पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला. याचबरोबर शेतीला शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत बडोद्यात सुमारे नवीन १२,००० विहिरी बांधल्या. १९३९-४० मध्ये बडोदा संस्थानात ७१,११५ पक्क्या व १७,०१८ कच्च्या विहिरी अस्तित्वात होत्या. दुष्काळ किंवा पुरासारख्या

संकटात शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या चारा संकटाला तोंड द्यावे लागू नये यासाठी सयाजीरावांनी १९२३-२४ मध्ये ३६ पशुखाद्य साठवणूक सहकारी संस्थांची निर्मिती केली.

शेतकऱ्यांमधील निरक्षरता हे त्यांच्या अधोगतीचे प्रमुख कारण आहे हे ओळखून सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत बडोद्यातील शेतकऱ्यांना कृषिविषयक अद्ययावत ज्ञान देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. शेतीसंबंधीचे आधुनिक ज्ञान मिळवण्यासाठी सयाजीरावांनी अनेक होतकरू विद्यार्थ्यांना सरकारच्या वतीने शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. खासेराव जाधव यांनी इंग्लंडमध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालयात पदवी शिक्षण घेतले. बडोद्यात परतल्यानंतर सयाजीरावांच्या प्रेरणेने खासेरावांनी शेतीमध्ये अत्याधुनिक परदेशी तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन दिले. सयाजीरावांनी १८९७ मध्ये खासेरावांच्याच नेतृत्वाखाली बडोद्यातील स्वतंत्र कृषी खात्याची स्थापना केली.

सयाजीरावांनी ऑक्टोबर १९१९ मध्ये खासेरावांप्रमाणेच उच्च शिक्षणसाठी इंग्लंडला पाठवलेल्या रामचंद्रराव माने-पाटील यांनी युरोपातील डेन्मार्क, स्वीडन, जर्मनी, नॉर्वे इ. देशांचा प्रवास करून तेथील शेतीची प्रगती, जमीन महसूल पद्धती इ. चे सखोल ज्ञान मिळवले. त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करून घेत सयाजीरावांनी माने-पाटलांच्या नेतृत्वाखाली ६४३ खेड्यातील ३३,५६४ बिघे जमीन लागवडीखाली आणली. कृषी

क्षेत्राच्या विकासासाठी संस्थानातील जनतेला साक्षर करतानाच विविध ठिकाणच्या सुधारणांचा चिकित्सक स्वीकार करण्याचे सयाजीरावांचे धोरण शिवाजी महाराजांच्या ध्येयपूर्तीकडे वाटचाल करणारे आहे.

## गनिमी कावा : शिवरायांचा आणि सयाजीरावांचा

मराठा बारगिरांनी जन्माला घातलेल्या 'गनिमी कावा' युद्ध तंत्राचा निजामशाही साम्राज्याचा सेनापती मलिक अंबरने विकास केला. तर या तंत्राचा उत्तम उपयोग करत शिवाजी महाराजांनी तत्कालीन भारतात 'सर्वात वेगवान' म्हणून ओळखले जाणारे सर्वसामान्यांचे सैन्य उभे केले. ब्रिटिश शासनाचे गुप्तहेर आयुष्यभर पाळतीवर असताना सयाजीराव महाराज आयुष्यभर त्यांना गुंगारा देत राहिले. आपल्या परदेश दौऱ्यादरम्यान सयाजीरावांनी श्यामजी कृष्ण वर्मा, मादाम कामा, केशवराव देशपांडे इ. क्रांतिकारकांना सातत्याने सक्रिय मदत केली.

शिवाजी महाराजांनी संपूर्ण भारताला स्वराज्याचे स्वप्न पाहायला शिकवले. स्वकर्तृत्वाने स्वतःचे राज्य स्थापन करून सुराज्यासाठीचे स्वराज्य प्रत्यक्षात उतरवले. सयाजीरावसुद्धा वयाच्या १२ व्या वर्षी अपघाताने बडोदा गादीचे वारसदार झाले. राज्याभिषेकावेळी निरक्षर असणाऱ्या सयाजीरावांनी त्यानंतर शिक्षण घेऊन आयुष्यभर ग्रंथ आणि विद्वान यांच्याशी स्वतःला एकरूप करून लोकप्रशासनाचे नवीन विक्रमच प्रस्थापित केले. स्वतःच्या व्यासंगाने जगातील सर्व प्रतिष्ठित ज्ञानकेंद्रांचे सन्मान

मिळवले. हे सर्व त्यांनी देश पारतंत्र्यात असताना देशातील ५६४ राजे ब्रिटिशांचे मांडलिक असताना ब्रिटिशांशी त्यांच्या पूर्वजांचा असणारा मैत्रीचा करार लंडनच्या कोर्टात सिद्ध करून सार्वभौम राजा म्हणून स्वतःची प्रतिष्ठा इंग्रजांशी संघर्ष करत अबाधित ठेवली.

स्वतः इंग्रजांची गुलामी नाकारत असतानाच आपल्या देशाने इंग्रजांच्या गुलामगिरीविरुद्ध केलेल्या संघर्षात मोठ्या भावाची भूमिका बजावली. दादाभाई नौरोजींपासून ते पंडित नेहरूंपर्यंत सर्व जहाल-मवाळ स्वातंत्र्यवीरांना लागेल ती मदत केली. जणू ते १९ व्या शतकात शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि सुराज्य ही संकल्पना प्रत्यक्ष जगत होते. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये प्रेरणापुरुष म्हणून लाला लजपतरायांपासून सुभाषचंद्र बोसांपर्यंत सर्व नेत्यांनी शिवाजी महाराजांची प्रतिमा इंग्रजांच्या गुलामगिरीविरुद्ध लढण्यासाठीचा प्रेरणास्त्रोत म्हणून उपयोगात आणली. म्हणूनच मराठा साम्राज्याच्या अस्तानंतर ५७ वर्षांनी शिवाजी महाराजांचे स्वप्न सत्यात उतरणारा राज्यकर्ता भारताला लाभला. महाराजांच्या ५८ वर्षांच्या राज्यकारभाराच्या इतिहासात सातत्याने शिवाजी महाराजांचे धोरण केंद्रस्थानी दिसते. हा योगायोग नव्हता.

याचा पुरावा म्हणजे १४ एप्रिल १९३३ रोजी सातारा म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर देताना सयाजीरावांनी केलेले भाषण होय. या भाषणात सयाजीराव म्हणतात, “सातार चाव

आमचा संबंध नवा नाही, तो जुनाच आहे. राजकीय संबंधाप्रमाणेच आमचे शारीरिक संबंध झाले आहेत, असे इतिहासावरून तुम्हास आढळून येईल. या इतिहासाचा पोकळ अभिमान धरण्यात हशील नाही. त्याचे निःपक्षपाती बुद्धीने निरीक्षण करून त्यापासून जरूर तो बोध आपण घेतला पाहिजे. शिवाजी महाराजांचा सन १६६० ते ६५ च्या सुमारास राज्याभिषेक सोहळा झाला. तारखेत कदाचित चूक असेल, कारण मी अंदाजाने बोलत आहे व सन १८१८ त पेशवाई बरोबर मराठ्यांचे राज्य बुडाले, म्हणजे मराठी राष्ट्र अवघे १५०-२०० वर्षच टिकले. हा काळ इतिहासात किती अल्प आहे? मनुष्याप्रमाणे राष्ट्रालाही कार्य करण्यास इतिहासात 'काल आणि स्थल' (Time and Space) यांची जरूरी असते. या दोन्ही गोष्टी दुर्दैवेकरून मराठी राज्यास मिळाल्या नाहीत. ज्या राष्ट्राला आपले सामर्थ्य व सत्ता १५०-२०० वर्षे ही नीट टिकविता आली नाही, त्यास जगाच्या इतिहासांत राष्ट्र म्हणून कोणते स्थान मिळेल? मराठी सत्तेचे स्मारक म्हणून आज एक तरी चांगली इमारत किंवा राज्य पद्धतीचे एखादे वैशिष्ट्य आपणास दाखविता येण्यासारखे आहे काय? तेव्हा असल्या अल्पजीवी राष्ट्राबद्दल पोकळ अभिमान धरण्यापेक्षा ते इतक्या लवकर व थोड्या काळात का नाहीसे झाले याचा तुम्हास उपयोग होईल."
शिवाजी महाराजांचे साम्राज्य अल्पजीवी का ठरले या प्रश्नाची ८८ वर्षांपूर्वी सयाजीरावांनी केलेली चर्चा मराठ्यांच्या एकाही इतिहासकाराने आजवर केलेली नाही. सयाजीरावांच्या या

चिंतनात राज्य कसे करायचे आणि राज्य कसे करायचे नाही या दोन्हीही प्रश्नांची उत्तरे लपलेली आहेत.

## सर्वसमावेशक राज्यकारभार

सयाजीरावांनी राज्यकारभाराच्या अगदी सुरुवातीपासूनच शिवाजी महाराजांचा आदर्श शतप्रतिशत अवलंबला होता हे यावरून स्पष्ट होते. म्हणूनच चक्रवर्ती राजगोपालचारी म्हणतात, "हिंदुस्थानात आतापर्यंत दोनच खरे राजे झाले आहेत, ते आहेत छत्रपती शिवाजी महाराज आणि सयाजीराव महाराज." शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील सुराज्य सयाजीरावांनी बडोद्यात प्रस्थापित केले. त्यामुळे सयाजीराव हे शिवाजी महाराजांच्या स्वराज्य धोरणाचे खऱ्या अर्थाने पहिले निर्माते होते. त्यामुळेचपंडित मदन मोहन मालवीय यांचे 'महाराजा सयाजीराव हे हिंदुस्थानातील शिवाजीनंतरचे शेवटचे आदर्श राजे होत.' हे विधान सयाजीरावांचे सर्वात योग्य मूल्यमापन ठरते.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीच्या कार्यात सर्व जातीधर्मीयांना सामावून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. शिवाजी महाराजांचे सैन्य मुख्यतः कुणबी, सुतार, वाणी व हीन जाती यांनी बनले असल्याचे निरीक्षण प्रवासी अली इब्राहीम खान यांनी त्यांच्या 'तारीख–ए-इब्राहीम खान' या ग्रंथात नोंदवले आहे.लष्करी अधिकारीपदी मराठा, मुलकी प्रशासनात ब्राम्हण व प्रभू आणि आरमारामध्ये कोळी व भंडारी या जातीच्या लोकांचा समावेश करून शिवाजी महाराजांनी प्रशासकीय पातळीवर

जातीय समानतेचा अनोखा आदर्श प्रस्थापित केला.पाचाड येथील जिजाबाईंच्या राजवाड्याच्या सुरक्षेची जबाबदारी महार जातीतील लोकांवर सोपवण्यात आली होती. शिवाजी महाराजांच्या सर्वधर्म समभावाची स्तुती करताना इतिहासकार काफीखान लिहितो, "हा शिवाजी आपल्या सैन्यासही मशिदी, कुराण व बायबल यांचा अपमान कधीही करू देत नसे. मालमत्तेची जाळपोळ व लूट करताना जर त्याला कुराण किंवा बायबल आढळले तर ते मोठ्या आदरपूर्वक जवळ घेई व आपल्या नोकरवर्गातील मुसलमान अथवा ख्रिस्ती धर्मीयांना देत असे.''

शिवाजी महाराजांप्रमाणे सर्वधर्म समभावाचे तत्त्व आपल्या संस्थानात रुजवतानाच सयाजीरावांनी तुलनात्मक धर्म अभ्यासाच्या अधिष्ठानावर आधारित धर्मसुधारणेचा अनोखा कार्यक्रम विकसित केला. संस्थानातील प्रजेला धर्म आणि आचार यासंबंधीचे विचारस्वातंत्र्य असावे व परधर्माचा स्वीकार केल्याने त्यांच्या विशिष्ट हक्कांवर बाधा येऊ नये या हेतूने सन १९०१ मध्ये धार्मिक स्वातंत्र्य निबंध हा कायदा पास केला. या कायद्यात कोणत्याही व्यक्तीला त्याने स्वतः प्राप्त केलेल्या हक्कांवर धर्मांतराने किंवा जाती बहिष्काराने बाधा येऊ नये हे या कायद्याचे मुख्य तत्त्व होते. त्याचबरोबर धर्मांतर केल्याची बाब नोंदणी कामदाराकडे पूर्वसूचना देऊन नोंदविण्याची व धर्मांतर करणारा व्यक्ती ते करण्यापूर्वी काही मुदतीपर्यंत या राज्यात

राहत असण्याची माहिती ठेवण्याची योजना या कायद्यात करण्यात आल्यामुळे जबरदस्तीने होणाऱ्या धर्मांतराला प्रतिबंध घातलागेला. आधुनिक भारतातील अशा प्रकारचा हा पहिला कायदा होता. जबरदस्तीने महंमद कुलीखान बनलेल्या सेनापती नेताजी पालकरांचे आणि बजाजी निंबाळकरांचे धर्मांतर घडवून आणत शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या स्वधर्म रक्षणाचा सहिष्णू कार्यक्रम सयाजीरावांनी या कायद्याच्या माध्यमातून विकसित केला. हा कायदा करत असताना हिंदू धर्माचा अतिरेकी अभिमान यामागे नव्हता तर देशी धर्म आणि संस्कृतीतील स्वत्त्व जपण्याचा तो एक आधुनिक प्रयत्न होता.

सत्यशोधक चळवळीचे जनक महात्मा फुलेंना १८८९ मध्ये त्यांच्या आजारपणात व त्यांच्या पश्चात सावित्रीबाईंना आर्थिक मदत केली. स्वातंत्र्य चळवळीच्या कार्याला मदत म्हणून सयाजीरावांनी हिंदुत्ववादी टिळकांना पुण्यातील स्वमालकीचा गायकवाड वाडा कागदोपत्री व्यवहार दाखवून भेट दिला. परंतु गीता रहस्य ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यातील जातिव्यवस्थेबाबतच्या टिळकांच्या मागासलेल्या धोरणांवर थेट आणि परखडपणे टीका करायलाही ते विसरले नाहीत. १९३० मध्ये सयाजीरावांनी हिंदू महासभेच्या डॉ. मुंजेंना अस्पृश्योद्धाराच्या कार्यासाठी १२,००० रु.ची मदत केली. प्रत्येक विचारसरणीच्या व्यक्तींना त्यांच्या कार्याचा हेतू लक्षात घेऊन मदत करण्याचे सयाजीरावांचे धोरण म्हणजे शिवाजी महाराजांच्या सर्वसमावेशकतेची ‘प्रगत’ आवृत्ती होती.

## स्त्री-सन्मानाचे धोरण

स्त्रियांशी दुर्वर्तन केल्यानंतर शिवाजी महाराजांनी रांझे गावचा पाटील व बेलवाडीचा किल्लेदार सुखोजी गायकवाड यांना केलेली शिक्षा आपण जाणतोच. 'पर स्त्री मातेसमान' मानणाऱ्या शिवाजी महाराजांनी स्त्रियांना सन्मानजनक आयुष्य जगण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा केलेला प्रयत्न हा भारतातील स्त्रीमुक्तीचा महत्त्वपूर्ण टप्पा होता. शिवाजी महाराजांच्या धोरणाचा वैज्ञानिक विकास करत सयाजीरावांनी स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न केले. या संदर्भात महाराजांच्या वैयक्तिक जीवनातील कृतिशीलता अधोरेखित करणारे दोन संदर्भ विचारात घ्यावे लागतात. पहिला संदर्भ म्हणजे महाराणी चिमणाबाई (दुसऱ्या). महाराणी बडोद्यात आल्या तेव्हा निरक्षर होत्या. त्यानंतर सयाजीरावांनी त्यांना शिक्षण दिले,२४ वर्षाच्या आपल्या जगप्रवासात सतत बरोबर ठेवले.महाराजांच्या या प्रागतिक धोरणाचा परिणाम म्हणून महाराणी चिमणाबाईंनी १९११ मध्ये 'The Position of Women In Indian Life' हा ग्रंथ लिहिला. तो लंडनमधून प्रसिद्ध झाला. आधुनिक भारतातील एखाद्या राणीने लिहिलेला हा पहिला ग्रंथ होता. या ग्रंथाचे वेगळेपण म्हणजे जगातील सर्व खंडातील स्त्रियांच्या दर्जाचे प्रत्यक्ष अवलोकन करून तुलनात्मक पद्धतीने लिहिलेला हा जगातील आज अखेरचा एकमेव ग्रंथ आहे.

दुसरा संदर्भ म्हणजे महाराजांची कन्या इंदिरादेवी यांनी त्यांचा सयाजीरावांनी ग्वाल्हेरच्या माधवराव शिंदेंशी ठरवलेला विवाह स्वतःहून मोडून बंगाल प्रांतातील कुचबिहार संस्थानचे आदिवासी राजे जितेंद्र नारायण यांच्याशी केलेला मराठा-आदिवासी विवाह होय. शाहू महाराजांना धनगर-मराठा विवाहाची प्रेरणा देणारा हा विवाह सयाजीरावांच्या मनाविरुद्ध झाला असला तरी ते मुलीच्या या निर्णयात ठामपणे तिच्याबरोबर उभे राहिले. स्त्रियांना कौटुंबिक सन्मान आणि आर्थिक स्वायत्तता प्रदान करण्यासाठी सयाजीरावांनी कायदेशीर प्रयत्न केले. १९३३ मध्ये बडोद्यात लागू झालेल्या हिंदू स्त्रियांचा संपत्तीतील हक्क कायद्यामध्ये हिंदू महिलांना वारसा हक्काने कौटुंबिक संपत्तीत हिस्सा देण्यात आला. अशा प्रकारचा कायदा करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान आहे. भारतीय स्त्री मुक्ती चळवळीच्या इतिहासात हिंदू कोड बिलाचे स्थान अनन्यसाधारण आहे. भारतीय राज्यघटनेत हिंदू कोड बिलाची चर्चा सुरू होण्याआधी ४५ वर्षे म्हणजे १९०५ पासून हिंदू कोड बिलाची अंमलबजावणी बडोद्यात सुरू झाली होती. हिंदू कोड बिलात समाविष्ट असणाऱ्या ६ घटकांशी संबंधित सर्व कायदे सयाजीरावांनी १९०५ ते १९३३ या काळात लागू केले होते.

२० मार्च १९३३ रोजी पुण्यात मराठा समाजाच्या वतीने सयाजीरावांना मानपत्र देण्यात आले. या मानपत्रास उत्तर देताना केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, “कोणत्याही एकाच जातीस उत्तेजन देणे केव्हाही श्रेयस्कर होणार नाही. राष्ट्र व जात यांच्यामधील संबंध हात आणि बोटे यांच्याप्रमाणे आहे. ... ज्या जाती मागास आहेत त्यांना उत्तेजन देणे आवश्यक आहे. मात्र या बाबतीत proportion म्हणजे प्रमाण पाहिले पाहिजे. ज्या प्रमाणात एखादी जात मागासली असेल तेवढ्याच प्रमाणात तिला उत्तेजन द्यावे. तसे करणे न्याय्य ठरेल.” सयाजीरावांची ही भूमिका पुन्हा एकदा आपल्याला शिवाजी महाराजांच्या सर्व समावेशक धोरणाची आठवण करून देते.

## शाक्त संप्रदाय

शिवाजी महाराजांच्या पहिल्या राज्याभिषेकाची महाराष्ट्र अभिमानाने दखल घेतो. परंतु १४ सप्टेंबर १६७४ रोजी शिवाजी महाराजांनी केलेला शाक्त (दुसरा) राज्याभिषेक जो शिवाजी महाराजांच्या जीवनातील सर्वात क्रांतिकारक टप्पा होता असे कॉ. शरद पाटील म्हणतात तो मात्र संशोधकांच्या आणि अभ्यासकांच्या दृष्टीने एक ‘अडगळीतील’ विषय ठरला आहे. कॉ. पाटलांच्या या संदर्भातील संशोधनाचा निष्कर्ष फारच क्रांतिकारक आहे. कारण शाक्त पंथ हा जातीय आणि स्त्री-पुरुष विषमता नाकारणारा समतावादी पंथ होता. या पंथाचा सर्वात महत्त्वाचा उत्सव हा घटस्थापनेचा होता.

घटस्थापनेचा उत्सव हा कृषी संस्कृती आणि स्त्रीशक्तीचा उत्सव आहे. आद्य स्त्रीसत्ताक राणी निर्ऋतीची कन्या दुर्गेच्या जागराचा हा उत्सव शाक्त पंथात सर्वात महत्त्वाचा मनाला जातो. शिवाजी महाराजांनी दुसरा राज्याभिषेक प्रस्थापित इतिहास म्हणतो त्याप्रमाणे अंधश्रद्धेतून केला होता हे म्हणणे सहज खोडून काढणारे वरील संदर्भ विचारात घेता जाती अंताच्या क्रांतीतील हा एक अत्यंत निर्णायक टप्पा होता.हा राज्याभिषेक आणि संभाजी महाराजांची संस्कृत तज्ज्ञता यांचा थेट संबंध होता. कॉ. शरद पाटील म्हणतात त्याप्रमाणे दुसऱ्या राज्याभिषेकाचा सल्ला संभाजी महाराजांनी दिला होता. कारण संभाजी महाराजांनी समतावादी शाक्त धर्माच्या प्रस्थापनेचा आरंभ केला होता. त्यांनी आपल्या पत्नीला 'श्री सखी राज्ञी जयति!' या शिक्यासह राज्यकारभार करण्याचे अधिकार दिले होते. भारतीय राजवंश परंपरा विचारात घेता या परंपरेत स्त्रीला असे अधिकार दिल्याचे उदाहरण सापडत नाही.

अस्पृश्यांना ब्राह्मण पुरोहिताचे अधिकार बहाल करणे, पुरोहितांना परीक्षा घेऊन धार्मिक विधीचा परवाना देणारा कायदा, क्रांतिकारक हिंदू कोड बिल तयार करून स्त्री-पुरुष विषमता नष्ट करणारा निर्णय हे सर्व शिवाजी महाराजांच्या धर्म आणि जातविषयक धोरणाचे कालसुसंगत विकसित रूपच होते. या जोडीला शिवाजी महाराजांची शाक्त परंपरा अजाणतेपणी सयाजीरावांनी बडोद्यात जपली होती. शाक्त

राज्याभिषेकानंतर 'ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो' अशी सडेतोड भूमिका घ्यायला शिवाजी महाराजांनी सुरुवात केली. सयाजीरावांनी हिंदू पुरोहित कायदा आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा या दोन कायद्यांच्या कलमांमध्ये कायद्याचा भंग करणाऱ्या ब्राह्मणांना आर्थिक दंड आणि तुरुंगवास अशा शिक्षांची तरतूद करून शिवाजी महाराजांच्या धोरणाशी अधिक आत्मविश्वासाने संवाद साधला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायावरील अधिकारी पंडित म्हणून जगविख्यात असणारे बिनोयतोष भट्टाचार्य सुरुवातीला प्राच्यविद्या संस्थेच्या गायकवाड ओरिएंटल सिरिजचे संपादक व नंतर प्राच्यविद्या संस्थेचे संचालक एकूण २९ वर्षे बडोद्यात कार्यरत होते. मूळचे बंगालचे असणारे भट्टाचार्य 'बडोद्याचे भट्टाचार्य' म्हणून जगभर ओळखले जात होते. ब्राह्मणी, जैन आणि बौद्ध या तिन्ही धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून त्यांनी बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायाचे अनन्य महत्त्व उजेडात आणले. मध्ययुगीन हिंदू परंपरेतील शक्ती देवता आणि महायान पंथातील प्राज्ञ (Prajna) या देवतांमधील साम्य दाखवून देत भट्टाचार्यांनी बौद्ध धर्माच्या बुद्धोत्तर तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले.

१९९० च्या दशकात कॉ. शरद पाटील यांनी याच दिशेने बौद्धिक प्रवास करत बौद्ध तत्त्वज्ञान वर्णव्यवस्था अंताचे कार्यक्रम देते, ते जातिव्यवस्था नष्ट करण्याचा कार्यक्रम तयार करू शकत नाही. त्यासाठी जातिव्यवस्थेचे खंडन करणारे बुद्धोत्तर असंघ,

वसुबंधू, दिग्नाग, धर्मकीर्ती आणि अश्वघोष यांचे तत्त्वज्ञान स्वीकारण्याची गरज आहे, अशी क्रांतिकारक मांडणी केली. कॉ. शरद पाटलांच्या मांडणी मार्गे जेव्हा आपण भट्टाचार्यांच्या योगदानाकडे पाहतो तेव्हा सयाजीरावांच्या शाक्त धर्माबाबतच्या द्रष्टेपणाची साक्ष मिळते.

वरील तपशिलांना पूरक बाबी म्हणून पुढील बाबींचा उल्लेख करता येईल. १८९६ च्या बडोद्यातील वेदोक्त प्रकरणानंतर सयाजीरावांनी आपल्या राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचा आदेश काढला. त्यानंतर आपल्या राजवाड्यात वेदोक्त पद्धतीने होणाऱ्या धार्मिक विधींचा अर्थ व हेतू समजून घेण्यासाठी सयाजीराव २ ते ३ वर्षे संस्कृत शिकले होते. २६ सप्टेंबर १९०९ ला विठ्ठल रामजी शिंदेंच्या पुण्यातील डिप्रेस्ड क्लास मिशनच्या पुणे येथील शाळेच्या बक्षीस वितरण समारंभास महाराज आले असता स्वागतावेळी महार, मांग व चांभार या जातीच्या तीन स्त्रियांनी महाराजांना ओवाळले होते. सयाजीरावांनी वेगवेगळ्या प्रांतातील व जातीधर्मांचे पदार्थ राजवाड्यात बनवले जावेत यासाठी मुसलमान, पारसी, मद्रासी, हिंदुस्थानी आणि फ्रेंच इ. स्वयंपाकी राजवाड्यातील स्वयंपाकघरात नेमले होते. १८८७ मध्ये पहिल्या परदेशवारीदरम्यान सयाजीरावांनी युरोपातून कॅसल यांचा 'Dictionary of Cookery' हा ग्रंथ मराठीत भाषांतर करण्याचे

आदेश दिवाणांना दिले होते. त्याचबरोबर सर्व संस्कृतीतील पाककलांचा परिचय करून देणारे १० ग्रंथ सयाजीरावांनी प्रकाशित केले होते.

## राजव्यवहार कोश

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या वेळी प्रशासकीय सोयीसाठी राजव्यवहार कोश तयार करून घेतला होता हे आपण जाणतोच. सयाजीराव महाराजांनी इंग्रजी, मराठी, गुजराथी, संस्कृत, उर्दू, पारशी, हिंदी आणि बंगाली या ८ भाषांतील ‘श्रीसयाजीशासनशब्दकल्पतरू’ हा राज्यव्यवहार कोश तयार करून घेतला. १९३३ मध्ये पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात ७२ संस्थांतर्फे सयाजीराव महाराजांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगीच्या भाषणात सयाजीरावांच्या राज्यव्यवहार कोशाबद्दल बोलताना न.चिं. केळकर म्हणाले, “नुकताच अनेक प्रांतीय भाषांचा उपयोग करून, थोरल्या शिवछत्रपतींचे अनुकरण करून सयाजीराव महाराजांनी एक प्रकारचा नवा राज्यव्यवहार कोशच निर्माण केला आहे. त्यावरून त्यांचे भाषांविषयीचे निःपक्षपातीत्व दिसून येते.” केळकरांचे सयाजीरावांच्या राज्यव्यवहार कोशाबद्दलचे भाष्य महत्त्वाचे आहे. कारण शिवाजी महाराजानंतर असे काम करणारे ते एकमेव प्रशासक आहेत. भारताने आपल्या बहुभाषिक समाज, संस्कृतीला न्याय देण्याच्या भूमिकेतून साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट यासारख्या संस्थांच्या माध्यमातून भारत सरकारने स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात असे प्रयत्न

सुरू केले. भारतीय राज्यघटनेने ज्या १७ भाषांना राज्य भाषांचा दर्जा दिला आहे त्या सर्व भाषांमध्ये ग्रंथनिर्मितीचा प्रयत्न करून एकप्रकारे शिवराय आणि सयाजीराव यांच्या धोरणाशी जोडून घेण्याचा प्रयत्न केला.

## शिवराय – सयाजीराव – यशवंतराव

महाराष्ट्रात शिवरायांनंतर त्यांचा वारसा थेट राजर्षि शाहूंशी जोडला जातो. हा वारसा जोडत असताना आपण आपलाचा इतिहास खंडित करत आहोत याचे भान राहत नाही. परंतु आपण शिवराय आणि सयाजीराव यांच्या धोरण आणि कृतीचा जेव्हा आपण जोडून विचार करतो तेव्हा आश्चर्यकारकरीत्या त्यामध्ये कमालीचे साम्य आढळते.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्र 'प्रतिशिवाजी' म्हणत असे. परंतु शिवाजी महाराजांचे विचार आणि धोरण बडोदामार्गे यशवंतरावांपर्यंत पोहोचले होते. जसे शिवाजी महाराजांचे प्रतिबिंब सयाजीरावांमध्ये स्पष्टपणे दिसते तसेच सयाजीरावांचे प्रतिबिंब यशवंतरावांच्या सर्व विचार आणि धोरणांमध्ये पावलोपावली आढळते. मग ते सत्तेचे विकेंद्रीकरण असो, कसेल त्याची जमीनअसो, मोफत शिक्षणाचे धोरण असो, गाव तेथे ग्रंथालय, साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती किंवा धर्मविषयक धोरण आणि कृती या सर्व बाबी सयाजीरावांकडून आल्या होत्या असे म्हणण्यासाठी

भक्कम आधार उपलब्ध आहेत. या सर्व विश्लेषणाच्या आधारे शिवाजी महाराजांचे खरे वैचारिक वारसदार महाराजा सयाजीराव गायकवाड असल्याचा इतिहास स्पष्टपणे पुढे येतो. शिवाजी महाराजांचा 'सयाजीकेंद्री' पुनर्विचार आपला तुटलेला इतिहास जोडून अभ्यासला तर तो किती समृद्ध आणि बहूआयामी ठरू शकतो हे सिद्ध करणारे ठरेल.

●●●

## सयाजी ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

# महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
सयाजी ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com